ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

51@51

आम्ही ५१!

गोष्ट क्र.२१

उपासनेच्या आधी मौन पाळायचं असायचं. तेव्हा त्याचं फार महत्त्व लक्षात आलं होतं असं नाही. बऱ्याच वेळेस केवळ नियम आहे म्हणून किंवा शिक्षा होऊ नये म्हणून ते पाळलं जायचं. पण पुढे आणखी कळायला लागल्यावर ती सवय प्रयत्नपूर्वक वाढवली. या कृतीचा अर्थ समजला, तेव्हा त्याचं महत्त्व लक्षात आलं. मौन हे सुद्धा प्रचंड संवादी असतं आणि त्या वेळेत जो आत्मसंवाद होतो, तो तुम्हाला खूप काही देऊन जातो. हा अनुभव चिंतन करायला लावणारा, मनोबल वाढवणारा आणि त्यातून तुम्हाला व्यक्ती म्हणून संपन्नता देऊन जाणारा असतो. जेव्हा तुम्ही हा अंतर्नाद ऐकता तेव्हा मनातल्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं नकळत मिळत जातात. आजूबाजूच्या परिस्थितीमुळे निर्माण झालेले ताण, व्यक्तिगत प्रश्न, त्यामुळे येणारी अस्वस्थता, मनातील उद्विग्नता या साऱ्यामुळे मनाचं संतुलन हरवू पहात असतं. एक प्रकारचं गढूळलेपण आलेलं असतं. गढूळ पाणी स्थिर भांड्यात ठेवल्यावर काही वेळानं सगळा गाळ खाली बसतो आणि नितळ पाणी वर येतं, तसा मौनातून होणारा आत्मसंवाद मनातील हा सगळा गढूळपणा खाली बसवून तुमचं नितळपण कायम ठेवतो. अशी ही सगळी प्रक्रिया असते. हा आतला आवाज तुम्हाला कायम तुमच्या कामामध्ये दिशा देणारा असतो, तुम्हाला तपासणारा असतो.

स्वाती महाळंक
(१९७९-१९८५)

बालपण आणि शालेय जीवन या गोष्टी कधीच विसरता न येणाऱ्या. त्यातल्या कितीतरी आठवणी कितीही मोठे झालो तरी मनात रुंजी घालत असतात. या सगळ्यामध्ये कायमच ताजी असणारी प्रतिमा अर्थातच प्रबोधिनीची. प्रबोधिनी लौकिकार्थाने शाळा असली तरी माझ्यासाठी ती फक्त शाळा कधीच नव्हती. जीवनाची खऱ्या अर्थाने ओळखही झालेली नसताना 'आयुष्य असं असतं तर' असं एक चित्र मनात रेखाटणारी, त्याचे पैलू सुस्पष्ट करणारी, ध्येय, निष्ठा अशा गुणांनी भारलेली, सळसळत्या उत्साही माणसांनी गजबजलेली अशी ती एक विलक्षण आकर्षण वाटावी अशी चैतन्यमय अनुभूती होती. त्यामुळेच प्रबोधिनी आजही आयुष्याचा एक अविभाज्य घटक आहे. त्या आठवणी कायमच मनामध्ये जाग्या असतात आणि मनाला ऊर्जा देऊन जातात.

शालेय शिक्षण अगदी हसत खेळत झालं. शिक्षण, अभ्यास म्हणून या काळात जेवढा ताण असतो तो गृहीत धरला तरी प्रबोधिनी या पाठ्यक्रमातील अभ्यासापुरती मर्यादित कधीच नव्हती. किंबहुना त्या पलीकडचं जे-जे काही तिथे होतं ते व्यक्ती आणि उपक्रम अशा विविध माध्यमातून आम्हाला मिळत होतं, ते केवळ अपूर्व असंच होतं. तसं म्हटलं तर कुठल्याही शाळेत गेलो तरी अभ्यासक्रम पूर्ण होणारंच असतो. पण पाठ्यपुस्तकाच्या बाहेरचं जे मी तिथे शिकले, ते खरोखर अद्वितीय होतं, हे आता आयुष्याच्या या वळणावर ठळकपणे जाणवतं. हे वेगळेपण कळण्याचं ते वय नव्हतं. पण मन-बुद्धी आणि शरीर या तिन्हीला चालना देणारी वेगवेगळी शिबिरं, सहली, पाठांतर, वेगळेपणाने साजरे होणारे उत्सव इत्यादी उपक्रमांमुळे ते दिवस खऱ्या अर्थानं समृद्ध होऊन गेले.

शाळेत पहिल्यांदा गेल्यावर वर्गात विद्यार्थ्यांना बसण्यासाठी टेबल-खुर्ची असल्याचं बघून खूप अप्रूप वाटलं होतं. आधीच्या शाळेत सरसकट बाक असायचे. प्रबोधिनीमध्ये पद्य आणि गाणी शिकणं हा माझ्या दृष्टीने एक अतिशय आवडता प्रकार होता. मला वाटतं, गाणी शिकल्यामुळे, वेगवेगळ्या निमित्तानं पद्य म्हणताना किंवा म्हटल्यावर तनामनाला मिळणारी ऊर्जा तुमचं सारं व्यक्तिमत्त्व प्रसन्न करते, दीर्घकाळ टिकते आणि सगळ्याच कामांमध्ये एक नवचैतन्य निर्माण करत जाते, हे त्यावेळीही वारंवार जाणवलं होतं, अनुभवलं होतं. प्रशालेच्या वेळापत्रकात इतर सर्व विषयांप्रमाणेच आम्हाला प्रतिभा विकसन आणि विद्युत (Electricity) या विषयांचे तास असायचे. घरातील मंडळी, नातेवाईक, परिचित स्नेहीजन हे विषय ऐकून चकित व्हायचे. 'अरे बापरे तुम्हाला शाळेत हे ही शिकवतात का?' अशी त्यांची स्वाभाविक प्रतिक्रिया असायची. पण या छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये शाळेचं वैशिष्ट्य लपलेलं होतं आणि अशा वेगळ्या विषयांवरील तासांमुळे विविधांगी विकास होत गेला, त्याचं महत्त्व आता कळतं.

आप्पांचा तास – वास्तवाशी जोडण्याचा प्रयत्न

प्रशालेत शिकतानाची आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे आप्पा स्वतः दर आठवड्याला वर्गात तास घ्यायला यायचे. या तासाचा काही विशिष्ट विषय ठरलेला नव्हता. आम्ही काय वाचावं, कसं वाचावं इथपासून अभ्यास कसा लक्षात ठेवावा, अशा अनेक गोष्टी ते सांगायचे. 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' आणि 'माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ' ही त्यांनी आमच्याकडून जाणीवपूर्वक वाचून घेतलेली पुस्तकं. पण त्याखेरीज अनेकदा ते सद्यस्थितीशी निगडीत विषयांवर (current affairs) बोलायचे. अलीकडच्या भाषेत सांगायचं तर परिस्थिती ज्ञानाचा तास. देशात, राज्यात, आपल्या सभोवती काय-काय चाललंय ही आजूबाजूची परिस्थिती आम्हाला समजावून सांगणं हा मोठा उद्देश त्यामध्ये होताच, पण विद्यार्थी म्हणून आमच्या मनातले विचार, खळबळ समजून घेणं आणि त्यातून योग्य दिशा देत, 'सांगून गोष्टी युक्तीच्या चार' आमच्या पैलूंचा विकास करणं हा ही सजग प्रयत्न होताच. मला आठवतं, आम्ही इयत्ता ६वीत असताना, मीनाक्षीपुरम इथे धर्मांतर झालं होतं. त्यावेळी नंतरच्या तासाला आप्पांनी आम्हाला धर्मांतर म्हणजे काय, ते का चुकीचं आहे, ते कसं थांबवता येईल, त्यासाठी आपण काय करायला हवं याबाबत सविस्तर माहिती देऊन विषय समजावून सांगितला होता. नंतर अविनाश धर्माधिकारी पंजाबचा दौरा करून आले. त्यावेळी पंजाबचा इतिहास आणि त्यांचं प्रवासवर्णन कथन करणारी व्याख्यानमाला आप्पांनी जाणीवपूर्वक आयोजित केली होती. ती व्याख्यानं ऐकल्यानंतर त्यावेळी पंजाबमध्ये सक्रीय जर्नेलसिंग भिंद्रनवाले, लोंगोवाल इत्यादी लोकांपासून पंजाबचा सगळा प्रश्नच बऱ्यापैकी समजून गेला.अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या परिस्थितीशी, पर्यायाने वास्तवाशी जोडण्याचा प्रबोधिनीने केलेला संस्कार अत्यंत महत्त्वाचा ठरला.

प्रबोधिनीची खेड-शिवापूरची यंत्रशाळा आणि करंजावणे इथला खांडसरी साखर कारखाना या दोन्ही ठिकाणी मला आप्पांबरोबर जायची संधी मिळाली होती. त्यांच्याबरोबर तो परिसर बघायला मिळाला. एकदा शिबिराला गेलो असताना रांझापर्यंत आप्पांनी चालत नेलं होतं आणि रांझाच्या पाटलाची गोष्ट शिवापूरच्या दादा पेंडसेंच्या वाड्यात रात्री सांगितली होती, तेव्हा ते सगळं चित्र डोळ्यासमोर जसंच्या तसं उभं राहिलं होतं. एकदा ज्येष्ठ उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर यंत्रशाळेत आले

होते. आप्पांनी आम्हाला त्यांची ओळख करून दिली. पण त्यावेळी हिंदुस्थानातील त्या दशकातील, काळावर ठसा उमटविणारी दोन खूप मोठी माणसं आपण एकत्र बघतो आहोत, याची कल्पना नव्हती. एक शिक्षणमहर्षी आणि एक उद्योगमहर्षी....दोन अलौकिक व्यक्तिमत्त्वं एकत्र असलेल्या विलक्षण क्षणांचे साक्षीदार होण्याचं भाग्य आम्ही तेव्हा अनुभवलं.

अतूट निर्धाराची पायाभरणी

अशा शिबिरांना गेलं की तिथे कधी आम्ही बैलगाडीतून फिरलो, कधी पायपीट केली. एकदा पुण्याहून शिवापूरला सायकलवर गेलो तर एकदा दोन तास एस्.टी. न मिळाल्याने ट्रकमधून शिवापूरहून पुण्याला आलो. त्या सगळ्यामध्ये मजा होती, त्यावेळी 'थ्रिल' वाटलं हे खरंच, पण या सगळ्यामुळे 'अमुक एक नाही' म्हणून रडत न बसता जेवढी साधनं उपलब्ध असतील त्यातून मार्ग काढत पुढे जाण्याची प्रेरणा मिळत गेली. 'जिथे जायचे ठरले तेथे आम्ही जाऊच जाऊ...' हाच संस्कार त्यातून नकळत होत गेला. मला वाटतं, जीवनातील कोणत्याही चढ-उतारांना धैर्याने सामोरे जाण्याच्या अतूट निर्धाराची ती पायाभरणी होती. या सगळ्या भटकंतीतून आणखी एक गोष्ट मनात पक्की झाली, ती म्हणजे खरा महाराष्ट्र हा पुण्या-मुंबईच्या बाहेरच वसलेला आहे. अत्यंत सुरक्षित कोशात राहणाऱ्या आपल्यासारख्या माणसांच्या मर्यादित जगाच्या पलीकडे एक मोठं, विस्तारलेलं जग आहे आणि ते परिस्थितीचे टक्केटोणपे खात अनेकदा बिकट वास्तवातून मार्गक्रमण करीत आहे. अशा सर्वसामान्य परिस्थितीत राहणारी ही माणसं जगण्याची लढाई रोजच लढत असतात, याचं वास्तवदर्शी भान यामधून येत गेलं. पुढे पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करताना त्याचा खूप उपयोग झाला. समाजातील वंचितांचे, महिलांचे प्रश्न, धरणग्रस्तांचे, विस्थापितांचे प्रश्न, पाणीप्रश्न समजून घेत त्यावर लिहिताना विदारक वास्तवाच्या दर्शनानं या जाणिवा अधिक टोकदार होत गेल्या.

युवती विभागाच्या सहली कायम वेगवेगळ्या गडकिल्ल्यांवर जायच्या. त्यामुळे राज्यातले अनेक दुर्ग पाहायला मिळाले. शिवछत्रपतींचा इतिहास वाचायला आवडायचाच. पुढे त्या सगळ्याचा अभ्यास केला. जलदुर्ग, भुईकोट म्हणजे काय, त्याचं स्थापत्य, किल्ले कसे बघावेत, का बघावेत हे शिकत गेले. नुसतंच फिरायला आवडतं म्हणून भटकायचं, सहलीला जायचं, मौजमजा करायची याच्या पुढे जाऊन पर्यटन हा ही डोळसपणे अभ्यासण्याचा विषय आहे, हे कळत गेलं आणि ही आवड इतिहासाच्या अभ्यासात, व्यासंगामध्ये परावर्तित झाली.

संध्याकाळी भरणारे दल हा एक उत्साहाचा भाग असायचा. तिथे खेळले जाणारे खेळ, म्हटली जाणारी गाणी, एकूणच तिथला माहौल हे सगळं नवं चैतन्य देणारं होतं. त्यामुळे मनात निर्माण होऊ पाहणाऱ्या विषमतेच्या, मतभेदाच्या छोट्या-छोट्या भिंती पुरत्या उभ्या राहण्यापूर्वीच गळून पडायच्या. हा असाच, ही अशीच या क्षुल्लक भेदांच्या पलीकडे जाणारं, हृदबंध दृढ करणारं मैत्रीचं नातं त्यातून तयार होत गेलं, ते महत्त्वाचं आहे. त्यातून बरोबरच्या लोकांना समजून घेणं, त्यांच्याशी आत्मीयतेचं नातं निर्माण करणं हा स्वभाव होऊन गेला. व्यावहारिक जगातल्या टिपिकल व्यावसायिक, काहीशा संशयी दृष्टीपलीकडे जाऊन तुम्ही लोकांकडे चांगुलपणाच्या नजरेनं पाहता तेव्हा तुम्हाला मिळणारी 'रिटर्न्स' पण अधिक भरीव, चांगली असतात, हा माझा अनुभव आहे. आज पत्रकारितेच्या जगात वावरताना त्यातलं वेगळेपण जाणवतं. मला आजही खूप लोक सांगतात की तुम्ही या क्षेत्रात असूनही मनाचा जो निखळपणा तुमच्याकडे आहे, तो सगळ्यांकडे नाही दिसत, तर तुम्ही अशा कशा राहू शकता, हा त्यांचा प्रश्न असतो. तर हा संस्कार मला जसा घरातल्या वातावरणातून मिळाला, तितकाच प्रबोधिनीमुळे मिळाला. हे संस्कार, निखळ माणूसपण आज कदाचित व्यावहारिक पातळ्यांवर नाही मोजता येणार, त्याचे तसे मापदंड उपलब्ध नाहीत. पण माणूस म्हणून जडणघडण होण्याची ही जी प्रक्रिया आहे, ती प्रबोधिनीत अगदी मजबूतपणे होत गेली.

उपासना आणि आत्मसंवाद

मला प्रबोधिनीतली भावलेली आणखी एक गोष्ट म्हणजे उपासना. आप्पांनी स्वतः आमचं मौंजीबंधन केलं होतं. त्यापूर्वी ते का करायचं, कशासाठी करायचं, त्याची जबाबदारी काय असते हे त्यांनी आम्हाला समजावून सांगितलं होतं. त्यामुळे आपण काहीतरी पवित्र करतो आहोत आणि आता आपली जबाबदारी वाढली आहे, ही एक जाणीव मनात कायम होती. उपासनेच्या आधी मौन पाळायचं असायचं. तेव्हा त्याचं फार महत्त्व लक्षात आलं होतं असं नाही. बऱ्याच वेळेस केवळ नियम आहे म्हणून किंवा शिक्षा होऊ नये म्हणून ते पाळलं जायचं. पण पुढे आणखी कळायला लागल्यावर ती सवय प्रयत्नपूर्वक वाढवली. या कृतीचा अर्थ समजला, तेव्हा त्याचं महत्त्व लक्षात आलं. मौन हे सुद्धा प्रचंड संवादी असतं आणि त्या वेळेत जो आत्मसंवाद होतो, तो तुम्हाला खूप काही देऊन जातो. हा अनुभव चिंतन करायला लावणारा, मनोबल वाढवणारा आणि त्यातून तुम्हाला व्यक्ती म्हणून संपन्नता देऊन जाणारा असतो. जेव्हा तुम्ही हा अंतर्नाद ऐकता तेव्हा मनातल्या सगळ्या प्रश्नांची

उत्तरं नकळत मिळत जातात. आजूबाजूच्या परिस्थितीमुळे निर्माण झालेले ताण, व्यक्तिगत प्रश्न, त्यामुळे येणारी अस्वस्थता, मनातील उद्विग्नता या साऱ्यामुळे मनाचं संतुलन हरवू पहात असतं. एक प्रकारचं गढूळलेपण आलेलं असतं. गढूळ पाणी स्थिर भांड्यात ठेवल्यावर काही वेळानं सगळा गाळ खाली बसतो आणि नितळ पाणी वर येतं, तसा मौनातून होणारा आत्मसंवाद मनातील हा सगळा गढूळपणा खाली बसवून तुमचं नितळपण कायम ठेवतो. अशी ही सगळी प्रक्रिया असते. हा आतला आवाज तुम्हाला कायम तुमच्या कामामध्ये दिशा देणारा असतो, तुम्हाला तपासणारा असतो.

तुम्ही कविता करता ना ?

मी लहानपणापासून कविता करायची. माझी पहिली कविता मी तिसरीत असताना 'एकता' मासिकामध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतरही अनेक कविता मासिकांमध्ये, नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाल्या. आप्पांची आणि माझी ओळखही कवितेमुळेच झाली. त्याचं असं झालं, पाचवीत असताना एका नियतकालिकात माझी कविता प्रकाशित झाली होती. ती आप्पांच्या वाचनात आली. त्यांनी प्रशालेमध्ये निरोप पाठवला, मला भेटायला बोलावल्याचा. मी घाबरतच भेटायला गेले. मनामध्ये प्रश्न आणि भीतीही...संचालकांनी भेटायला का बोलावलं असेल...? दबकतच दार वाजवलं आणि आप्पा हसतमुखानं उद्गारले, या या स्वातीताई, बसा. मी उडालेच. प्रशालेचे संचालक आणि माझ्यासारख्या पाचवीतल्या मुलीला अहो जाहो म्हणतात... त्यांचं असं आदरार्थी संबोधन वापरणं ही खूप विलक्षण गोष्ट वाटली होती तेव्हा. त्यांनी माझ्या कवितेचं कौतुक केलं, माझ्याशी गप्पा मारल्या. त्यानंतर अनेकदा माझ्या प्रकाशित कवितांना त्यांनी आवर्जून दाद दिली, कौतुक केलं. त्यानंतर वरचेवर त्यांच्याकडे जाणं व्हायला लागलं. कधी काही नवीन सुचल्यावर, काही नवीन वाचल्यावर, वक्तृत्वाचा करंडक मिळवल्यावर, नवं पद्य शिकल्यावर, कुणाचा राग आल्यावर आणि कुणाशी भांडण झाल्यावरही...! ते स्वतः पण अनेकदा बोलवायचे. काही बोलावंसं वाटलं तर, सांगावंसं वाटलं तर... त्यामुळे हे सगळं उभयपक्षी असायचं. गोपाळराव निरोप घेऊन यायचे. मला आठवतं, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचं 'सहा सोनेरी पानं' वाचायला घेतलं, त्यावेळी 'रोज मला भेटल्याशिवाय जायचं नाही', असा एकप्रकारे दंडकच घालून दिला होता आप्पांनी. त्यांच्याकडे गेलं की न चुकता दररोज काय वाचलं, किती समजलं, विचारायचे. अनेक नव्या गोष्टी सांगायचे. ते वाचून झालं नि त्यानंतर 'मोपल्यांचे बंड', 'संन्यस्तखड्ग', 'माझी जन्मठेप'.... कितीतरी.

कधी-कधी कंटाळा यायचा. आप्पांच्या बोलण्याकडे, प्रश्नांकडेही लक्ष नसायचं. लक्षात यायचं त्यांच्या ते ही... मग बासरी काढायचे, हळुवार एखादा राग आळवताना तल्लीन होऊन जायचे. कधी गाणं म्हणायला सुरुवात करायचे. 'असू आम्ही सुखाने पत्थर पायातील' हे मी त्यांच्याकडून अनेकदा ऐकलेलं आणि त्यांनीच मला शिकवलेलं पद्य. आता विचार करते तेव्हा जाणवतं, आप्पांचं उभं आयुष्य म्हणजे त्या पद्याचाच वस्तुपाठ होता. माझ्या हट्टाखातर त्यांनी मला बासरी वाजवून दाखवली, मला ताप आला तेव्हा कपाळावर मिठाच्या पाण्याच्या पट्ट्यासुद्धा ठेवल्या.

एकदा मी भेटायला गेले तेव्हा आप्पा जेवायला बसत होते. गोपाळराव वाढत होते. आप्पा म्हणाले, या, बसा जेवायला. त्यांच्याबरोबर छान गप्पा मारत जेवण झालं. जेवण झाल्यावर त्यांनी विचारलं, कसं वाटलं जेवण?, मी उत्तरले, मस्त होतं. त्याबरोबर त्यांनी सांगितलं, मग आता रोज येत चला. पुढचे २-३ दिवस मी रोज त्यांच्याबरोबर जेवायला जात होते. बहुधा सहावीत असतानाची गोष्ट आहे ही...नंतर एक दिवस शाळा सुटल्यावर सगळ्याजणी वरतीच खेळत बसलो. आप्पांकडे जेवायला जायचं विसरूनच गेले. साधारण दोन वाजले असावेत, गोपाळराव वर बोलवायला आले अन म्हणाले, अहो, इथे काय करताय तुम्ही, आप्पा तुमच्यासाठी जेवायचे थांबले आहेत. मी ओशाळले. खाली गेले. आप्पा शांत. रागाचा लवलेशही नाही. चला आता भूक लागली खूप. झालं ना खेळून, असं म्हणून हसत जेवायला लागले. तेव्हा त्यांनी आपल्याला किती गांभीर्याने घेतलं होतं, आणि आपल्यामुळे त्यांना खोळंबावं लागलं याचं खूप वाईट वाटलं होतं.

एकदा असंच चार-पाच दिवस मी त्यांना भेटायला गेले नाही. मग त्यांनी असाच पुन्हा निरोप पाठवला. मग गेल्यावर विचारलं, काय बरं कुठे आहात तुम्ही? कशा आहात, बऱ्या आहात ना? आला नाहीत भेटायला बरेच दिवस! मग मी अगदी सहज उत्तरले, हो! नाही आले. त्यावर आप्पा म्हणाले, तुम्ही म्हणजे काय अगदी फुलपाखरूच आहात, फुलपाखरू कसं एका फुलातला मध संपला की दुसऱ्या फुलाकडे जातं अगदी तशाच आहात तुम्ही.. आता जाणवतं, आप्पांजवळचा ज्ञानाचा, सौहार्दाचा अन् आत्मीयतेचा मकरंद कधीच संपणारा नव्हता.

त्यांच्या आचरणातून अनेक संस्कार सहजपणे होत गेले. पहिलं म्हणजे कधीही कुणालाही सामान्य लेखायचं नाही. त्यांच्या स्वभावातली जी ऋजुता होती ना, ती त्यांच्या आवाजासकट संपूर्ण व्यक्तिमत्त्वात उतरलेली होती. आणि त्यांच्या सहवासात आलेल्या व्यक्तीमध्ये ती आपोआप झिरपत जायची. मला त्यांची महत्त्वाची वाटलेली आणखी एक गोष्ट म्हणजे

त्यांना भेटायला गेल्यावर त्यांनी कधीही आम्हाला वाट बघायला लावली नाही, किंवा कधीही नंतर या, कामात आहे, म्हणून परत पाठवलं नाही. आमच्यासाठी कायमच त्यांचं कार्यालय हे मुक्तद्वार होतं. मोठ्या-मोठ्या लोकांबरोबर त्यांच्या बैठका चालू असायच्या, तरीही गेल्यावर हसून सहजपणे म्हणायचे, या, बसा. हातावर खडीसाखर द्यायचे, काहीतरी वाचायला द्यायचे. बैठक संपली की गप्पा सुरू, आणि हे सारं अगदी सहजपणे...कोणताही अभिनिवेश नाही. सध्याच्या काळात मोठेपणाचं अवडंबर माजवणारी अनेक माणसं सभोवती वावरताना पहिली की आप्पांच्या या वागण्याचं मोल वेगळेपणानं जाणवतं.

लताताई, आप्पा या सगळ्यांच्या वागण्यातून जाणवत गेलेली आणखी एक गोष्ट म्हणजे वय कमी होतं म्हणून कोणीही आम्हाला कधी कमी लेखलं नाही. आमचं बोलणं, म्हणणं खूप गांभीर्यानं घेतलं. अगदी शाळेच्या कार्यक्रमात एखादी छोटीशी गोष्ट करायची असली तरी आवर्जून मत विचारलं आणि अनेकदा ते ऐकलं. त्यामुळे वर्तनात आपोआप एक जबाबदारपणा येत गेला. कदाचित त्यामुळेच आज समाजात वावरताना, पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करताना, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या प्रशिक्षणांच्या माध्यमातून विविध क्षेत्रातल्या आणि वयोगटातल्या लोकांपर्यंत पोचताना वय, व्यवसाय, आर्थिक स्तर या बाबी कधी अडसर ठरत नाहीत. आबालवृद्धांशी मोकळेपणाने गप्पा मारू शकते. प्रत्येक वयाच्या व्यक्तीकडे सांगण्यासारखं काही ना काहीतरी असतंच, ते समजून घेण्याची क्षमता आपल्यात असायला हवी.

आप्पांच्या वर्तनातून मनात रुजलेला आणखी एक संस्कार म्हणजे 'इदं न मम' म्हणण्याची वृत्ती ! मला एका वक्तृत्व स्पर्धेत बक्षीस मिळालं. तो करंडक दाखवायला दुसऱ्या दिवशी आप्पांकडे गेलो, त्यांनी अभिनंदन केलं, गुलाबाचं फूल दिलं, हातावर खजूर ठेवला, भाषण म्हणून घेतलं, आणि नंतर विचारलं, आता पुढे काय? हा अगदीच अनपेक्षित प्रश्न होता. मी गोंधळलेली बघून पुढे म्हणाले, आता पुढच्या स्पर्धेत भाग घेताना आपलं भाषण आपल्यालाच लिहिता यायला हवं. आपल्याला बक्षीस मिळालं यात आता फार गुंतून पडायचं नाही. सारखं मी केलं, मला मिळालं, असं म्हणायचं नाही. आपण जे करतो ते परमेश्वराच्या कृपेने. त्याला सांगायचं 'हे तुझं आहे' आणि लगेच नवं काम सुरू करायचं. पद्मपत्रासारख्या अलिप्तपणे आणि नि:स्वार्थी भावनेने काम करणारी ही माणसं होती. त्याचा चिरंतन ठसा मनावर आहे.

स्वप्न एका पहाटेचे...!

आप्पा आणि आण्णा हे माझ्या आयुष्यातले इतके महत्त्वाचे घटक आहेत की त्यांच्याशिवाय मी प्रबोधिनीची कल्पनाच करू शकत नाही. व्यक्तीपेक्षा संस्था मोठी, हे जरी खरं असलं तरी या दोघांशिवाय प्रबोधिनी माझ्या मनात नाही येऊ शकत. आज जीवनाच्या विविध टप्प्यांवरून इथवर पोचल्यावर विचार करताना सतत जाणवतं की आप्पा आणि आण्णा ही दोन फक्त माणसं नव्हती माझ्या जीवनातली, तर काहीही झालं, दुखलं खुपलं, आनंद झाला, राग आला तरी ते सारं व्यक्त करण्याची ती माझी हक्काची ठिकाणं होती. माझ्यासाठी विश्रामस्थळं होती. ज्यांना तुम्ही मनातलं सगळं सांगू शकता, मोकळेपणानं बोलू शकता, अशी माणसं खूप कमी असतात. आजच्या जगातलं हे कटू वास्तव आहे. आणि अशी माणसं जीवनात असणं हे भाग्य असतं ते याचमुळे !

आप्पांइतकाच निरपेक्ष स्नेह दिला आण्णांनी. त्यांच्या स्वभावातलं स्नेहार्द्र आर्त मला कायमच भावलं. माझ्या कविता ते नेहमी वाचायचे, नवं काय लिहिलं याची चौकशी करायचे. माझ्या कविता वाचून त्यात सुधारणा सुचवायचे, मात्रा यमक तपासून बघायचे. दलात जात असताना मी दोन पद्य लिहिली होती. आण्णांनी त्याला चाली लावल्या होत्या. त्याचा फार आनंद वाटला होता त्यावेळी.



आण्णांचं कार्यालय दुसऱ्या मजल्यावर आणि आमची शाळा चौथ्या मजल्यावर. मी अनेकदा सकाळी शाळेत जायच्या आधी, सुचलेली नवी कविता वाचण्यासाठी त्यांच्या टेबलवर ठेवायची आणि मग वर शाळेत जायची. एके दिवशी सकाळी शाळेत गेले नी पाहते तर काय, वर्गातल्या माझ्या टेबलवर छानसं अबोली रंगाचं बंद पाकीट ठेवलेलं होतं. उत्सुकतेनं उचललं, त्यावर रेखीव लाल अक्षरात लिहिलं होतं, स्वातीच्या मोत्यांस नि मोत्यांच्या स्वातीस आण्णांच्या हस्ताक्षरातलं ते

पाकीट बघून मन शहारलं. पाकीट उघडलं, आतमध्ये आदल्या दिवशी वाचायला दिलेली माझी कविता होती. पुढे जाऊन आपण देशासाठी हे करूया, घडवूया अशा अर्थाचं यमक त्या कवितेत होतं. त्या प्रत्येक ओळीच्या पुढे आण्णांनी लिहिलं होतं, करूया... घडवूया... नक्की करूया...! आणि आणखी एक कागद त्याच्याबरोबर जोडलेला होता. मी तो उघडून वाचायला सुरुवात केली. आण्णांनी लिहिलं होतं, हे परमेशा, या कविहृदयाला कृतिहृद्य दे ! याला मोह पडू दे – उत्तम उदात्त उन्नत जीवनाचा, सामान्य जीवनाचा नको !! स्वप्न एका पहाटेचे. ते पत्र मनावर खूप खोल परिणाम करून गेलं. एक नवी दिशा दाखविणारं, जीवनाचा उद्देश जणू स्पष्ट करणारं पत्र...आजही प्रत्येक पाऊल उचलताना, काहीही काम करताना ते पत्र माझ्या सोबत माझ्या मनात जागं असतं...आजही प्रतीक्षा आहे त्या पहाटेची...!


हे परमेशा –
या कविहृदयाला कृतिहृदय दे !
याला मोह पडू दे –
उत्तम उदात्त उन्नत जीवनाचा
सामान्य जीवनाचा नको !!
स्वप्न – एका पहाटेचे
(७ फाल्गुन २०३९)
२६.२.६३

आण्णा बाहेरगावी गेले तरी हा पत्रसंवाद सदैव सुरू असायचा. एकदा ते दिल्लीला जाणार होते. त्या दिवशी त्यांना भेटायला गेले. ते बैठकीमध्ये होते. त्यात व्यत्यय आणावा असं वाटलं नाही. थोडावेळ वाट पाहून निघून आले. चार–पाच दिवसांनी टपालानं एक पाकीट आलं, त्यामध्ये आण्णांचं पत्र. किती लक्ष असावं बारकाईनं आणि किती काळजी करावी...ते दिल्लीला जाण्याच्या अगोदर तीन–चार दिवस मला बारीक ताप येत होता. पत्रात मुख्य त्याची चौकशी नि येण्यापूर्वी भेटता आलं नाही याची रुखरुखही...! 'मी परत आल्यानंतर भेटायला येणार ना', अशी प्रेमळ विचारणा...त्यातील ओलावा अन् आर्त मनात घर करून राहणारं....! हा सारा ऐवज मी आजही जपून ठेवला आहे.


प्रिय स्वाती –
दिल्ली, रवि. ९/३/९६
मी दिल्लीला येण्याच्या दिवशी तुपारी तू आलीस आणि न भेटताच निघून गेलीस याची रुखरुख अजूनही शिल्लक आहे. नेहमीच असं होतं. यावर काही उपाय आहे का? कल्पनाला विचारून पाहा.
...'प्रतिज्ञा आम्हा दे' असं म्हणण्यापूर्वीच तुला 'आजी'ने, त्या मोठ्याही 'आजी'ने, तुला ती दिली आहे. मग 'हृदतम बाबू दे' अशी मागणी आजीजवळ मागतेस की नाही? तेही मिळतील – नक्की – असतीलच. केवळ ऐकमेकांत अडकून पाहायचे मात्र!
तुला अधूनमधून ताप येतो. सांगत नाहीस काळजी – रुखरुख राहते. ते 'तेजस्वी' डोळे पुष्कळ काही सांगत असतात. पण ओठांना बिलकुल बोलू देत नाहीत. असं का बरं? बोलू दे ना त्यांना थोडं!
अभ्यास चांगला चाललाय ना? चालू दे. खूप गुण मिळू देत. त्यासाठी शुभेच्छा. रूपाली (कडेगावकर) सुजाता (शेट्ये) आणि नीतांजली (तळेगावकर) यांना अपर्णा, रेवती, मधुरेखा आणि त्यांच्या कन्यकांना नमस्कार सांग. भेट, बोलत आ, भेटशील? बोलशील ना माझ्याशी? तुझा
– आण्णा
पु. स्वाती म्हाळक.

महाविद्यालयात...

पुढे महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात सर परशुरामभाऊ कॉलेजमध्ये झालं. बी. कॉम. केलं. पण तेव्हाही मी अभ्यासात फार गुंतून नाही पडले. मार्क चांगलेच मिळायचे, पण भरपूर गुण म्हणजे सर्वस्व असं कधी वाटलं नाही. मी पदवी अभ्यासक्रम पूर्ण करत असतानाच ICWA ची दोन वर्षं पूर्ण केली, पण नंतर ते तिथेच सोडून दिलं. आपण फार काळ आकडेवारीत नाही रमू शकत हे लक्षात आलं होतं. मला साहित्यिक, सांस्कृतिक उपक्रमांमध्ये रस होता, लिहिण्यामध्ये रस होता, त्यामुळे या उपक्रमात मी सहभाग घेतला, भरभरून आनंद लुटला. त्याचवेळी सकाळ वृत्तपत्रात 'कॉलेज विश्व' हे साप्ताहिक सदर लिहिण्याची संधी मिळाली, कविता काही ठिकाणी प्रकाशित व्हायच्या, दैनिक तरुण भारत मध्ये 'क्षितिजे कर्तृत्वाची' नावाचं सदर लिहिलं. त्यावेळच्या महत्त्वाच्या वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा, नाट्यस्पर्धा, नाट्यवाचन अशा कितीतरी स्पर्धा केल्या. कॉलेजचं वाङ्मय मंडळ ३८ वर्षं बंद पडलेलं होतं, ते आम्ही पुन्हा सुरू केलं. कॉलेजची जी मौजमजा होती, तीही अनुभवली पण पुन्हा त्यात कुठे फार काळ गुंतून पडायला, भरकटायला नाही झालं. तिथे चालणारी बरीचशी हुल्लडबाजी, टवाळखोरपणा यापेक्षा काहीतरी ठोस आणि भरीव करणं शक्य आहे हे लक्षात येत गेलं आणि त्यावर जास्त भर दिला.

कॉलेजच्या निवडणुका म्हणजे एक गाजणारं प्रकरण असायचं. त्यातलं spirit जरी उत्तम असलं तरी त्यातून होणाऱ्या मारामाऱ्या, गुंडगिरी, कॉलेजच्या मालमत्तेचं होणारं नुकसान हे कधीच पटलं नाही. एका वर्षी विद्यापीठ प्रतिनिधीच्या निवडणुकीच्या दिवशी कॉलेजच्या आवारात दोन गटांची भांडणं झाली आणि जोरदार मारामारी सुरू झाली. आम्ही काहीजण पोर्चमध्ये उभे राहून हे बघत होतो. वर्गाच्या काचा फुटल्या. काठ्यांनी मारहाण सुरू झाली. मग मात्र मला ते बघवेना. मी चक्क तिथे घुसले आणि त्या दोन्ही गटांच्यामध्ये जाऊन उभी राहिले. कुठून धैर्य आलं कुणास ठाऊक. पण मारामारी करणारी सगळी पोरं विजेचा झटका बसावा तशी स्तब्ध झाली. मी त्यांना खडसावून विचारलं, हे काय चाललंय आणि तुम्ही काय करताय? उद्या तुमच्यापैकी कोणीही निवडून आलं तरी तुम्हाला असं वाटतं का की कॉलेजमधले लोक,

इतर मुलं तुम्हाला चांगलं म्हणतील? तुम्ही मारामारी करणारे सगळेच जण गुंड आहात हे तर आता सिध्द झालेलंच आहे. सगळी पोरं एकदम शांत झाली पण आधी प्रकरण इतक्या पुढे गेलं होतं की आमच्या प्राचार्यांनी पोलीसात तक्रार केली होती. त्यामुळे पाच मिनिटात पोलीस आले. पोरांच्या गराड्यात मला उभी पाहून त्यांनी विचारलं, तुम्ही काय करताय इथे? मी त्याच आवाजात सांगितलं, यांनी मारामारी थांबवावी म्हणून मी इथे येऊन बोलत होते. त्यांना समजावत होते. त्यानंतर दोन्ही गटांनी पोलिसांची आणि प्राचार्यांची माफी मागितली. खरंतर प्रसंग एवढा काही मोठा नव्हता. पण दोन्ही बाजूला शे-सव्वाशे मुलं तावातावाने भांडत, मारामारी करत असताना तिथे मध्ये जाऊन आपण उभं रहावं, हे बळ कुठून आलं? समोर चुकीचं काही घडत असताना केवळ बघ्याची भूमिका घेऊन गप्प रहाणं चुकीचं आहे आणि चुकीच्या गोष्टी थांबविण्यासाठी काहीतरी केलं पाहिजे, आपण सक्रीय झालं पाहिजे, हे कुठेतरी प्रबोधिनीच्या संस्कारातून आलं.

पत्रकारितेच्या क्षेत्रात पदार्पण

पदवी झाल्यानंतर पुढे M.Com. वगैरे न करता लिहायला आवडतं, साहित्याची आवड आहे तर पत्रकारितेचं शिक्षण घ्यावं, असं आईने सुचवलं. त्यामुळे प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पत्रकारिता अभ्यासक्रमाला पुणे विद्यापीठात प्रवेश घेतला. त्यावर्षी त्यामध्ये प्रतिष्ठेची समजली जाणारी कै. चिंतामणराव कोल्हटकर शिष्यवृत्ती आणि सुवर्णपदकही मिळालं. अभ्यासक्रम पूर्ण व्हायच्या आधीच सकाळ वृत्तपत्रात प्रशिक्षणार्थी पत्रकार म्हणून निवड झाली आणि मी तिथे रुजू झाले. तेव्हापासून सुरू झालेला पत्रकारितेतला प्रवास आता ३० वर्षं झाली अखंडितपणे सुरूच आहे.

बिरजू महाराज यांची मुलाखत घेताना

या काळात मी कामाच्या निमित्ताने, बातम्यांसाठी भरपूर फिरले. अक्षरशः राज्यभर पायपीट केली. आदिवासी, धरणग्रस्त, विस्थापित यांचे प्रश्न, पाणीप्रश्न, महिलांचे प्रश्न, दारूबंदीची मागणी करणाऱ्या महिलांच्या पंचायतीची स्थिती इत्यादी गोष्टींवर काम करत गेले. प्रश्न मांडत गेले. काही गोष्टींची सरकारी पातळीवर दखल घेतली गेली. प्रश्न सुटले. त्यामुळे नाडलेल्या अनेकांच्या वाट्याला सुखाचे चार क्षण आले, याचं समाधान मिळालं. या व्यवसायातली सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक ठळक होत गेली. या पायपिटीमुळे जीवनाचं आणखी जवळून, वास्तव दर्शन घडलं. जिथे जगणं ही रोजचीच लढाई आहे, अशा प्रतिकूल परिस्थितीत दिवस कंठणारी, फाटक्या अंगाची, चेहऱ्यांवरचं सुरकुत्यांचं जाळं दागिन्यासारखं मिरवणारी चिवट, लढाऊ माणसं बघितली आणि त्या संघर्षाला मनोमन सलाम करावासा वाटला. भीमाशंकरच्या आदिवासी पट्ट्यात एक हंडा पाण्यासाठी तीन तास चालून सोलवटलेले बायाबापड्यांचे पाय बघितले आणि ग्लासभर पाण्यातलं अर्धा ग्लास पाणी पिऊन बाकीचं भिरकावून देण्याची लाज वाटायला लागली. स्वतःच्या पलीकडे पाहणं, चौकटीबाहेरच्या जगाच्या व्यथा समजून घेणं ही समाजाशी नाळ जोडली गेली, त्याची सुरुवात प्रबोधिनीमधलीच !

सुमारे १२-१३ वर्षं वृत्तपत्रात, print media मध्ये काम केल्यानंतर मी सकाळमधली पूर्ण वेळ नोकरी सोडली आणि आकाशवाणी-दूरदर्शन या माध्यमांकडे वळले. आकाशवाणीमध्ये माझी सुरुवात अगदी लहानपणी झाली होती. मी बालकलाकार होते, वयाच्या पाचव्या वर्षापासून आकाशवाणीच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेत होते. त्यामुळे माईकची कधीच भीती वाटली नाही. पूर्णवेळ नोकरी सोडल्यानंतर २००४ पासून मी आकाशवाणीच्या news pannel वर काम करते आहे. प्रादेशिक बातम्या, आता गेल्या वर्षभरापासून पुण्यातून प्रसारित होणारी मराठीतील राष्ट्रीय बातमीपत्रे या साऱ्या जबाबदाऱ्या छान एन्जॉय करते आहे. लोक म्हणतात, आकाशवाणी, पुणे, स्वाती महाळंक प्रादेशिक बातम्या देत आहे...ही तुमची खरी ओळख आहे, ऐकून खूप छान वाटतं. कोट्यावधी श्रोत्यांपर्यंत आवाजाच्या माध्यमातून पोचताना अधिक परिपूर्ण होण्याची ओढ मनाला व्यापून राहते. त्यामुळे या सुमारे दोन दशकांत आकाशवाणीशी माझे ऋणानुबंध अधिक दृढ झाले. या सगळ्या कामातून श्रोत्यांपर्यंत पोचण्याचा मिळणारा आनंद विलक्षण आहे. याबाबतीत आकाशवाणी हे अत्यंत बलशाली

माध्यम आहे. समोरचा माणूस निरक्षर असो, जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात असो, कामात गुंतलेला असो, त्याच्यापर्यंत आकाशवाणी सहजपणे पोचते. सामान्यातल्या सामान्य जनतेपर्यंत पोचता येतं. इथे बातमीपत्रांखेरीज साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक विषयांवरील कार्यक्रमांसाठी संहिता लेखन केलं. चालू घडामोडींबद्दल मुलाखती घेतल्या. अजूनही हे सगळं तितक्याच उत्साहात सुरू आहे.

खासदार अरविंद सावंत यांच्या हस्ते राज्यस्तरीय रणरागिणी पुरस्कार स्वीकारताना

प्रसारमाध्यमांमध्ये काम करताना वेळेच्या नियोजनाबाबत अधिक काटेकोर झाले. print media मध्ये तुम्ही तासानुसार वेळापत्रक आखून काम करता, तेच इलेक्ट्रॉनिक मिडीयामध्ये, आकाशवाणी, दूरदर्शनमध्ये सेकंदांनुसार करावं लागतं. तुम्हाला जास्त update रहावं लागतं. आकाशवाणी पुणे केंद्रावरून सकाळी ७ वाजून १० मिनिटांनी प्रादेशिक बातमीपत्र प्रसारित होतं. त्यासाठी वृत्तनिवेदक स्टुडीओमध्ये ७.०० वाजता हजर असावा लागतो. त्यापूर्वी त्याला वाचनासाठी, सरावासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून अर्धा तास आधी बातमीपत्र तयार असावं लागतं. ते वेळेत पूर्ण होण्यासाठी त्याचं काम आम्हाला पहाटे पाचला सुरू करावं लागतं. इकडे-तिकडे वेळ घालवायला तिथे जागाच नाही. जे काही आहे ते आत्ता आणि या क्षणी. दुसरं म्हणजे निर्णय घेण्याची क्षमता तिथे तावून सुलाखून निघते. ही बातमी मी बातमीपत्रात का घेणार आहे किंवा का घेणार नाही, याचं ठोस कारण असावं लागतं. एखादी महत्त्वाची, संवेदनशील ठरेल अशी बातमी असते. पण ती नक्की खरी आहे का, असे प्रश्न अनेकदा उद्‌भवतात. ती बातमी confirm होत असेल तरच ती घ्यावी, नाही तर मला ती ठामपणे बाजूला ठेवता आली पाहिजे. आणि बातमी confirm करायची असेल तर माझ्याकडे तेवढे तगडे sources असले पाहिजेत की दोन फोन फिरवले, विशिष्ट ठिकाणी चौकशी केली की ही बातमी खरी की खोटी हे confirm होईल. याची, अशी मानसिक तारांबळ समर्थपणे हाताळण्याचीही मानसिक तयारी असावी लागते. तुम्ही बातमीपत्र सादर करत असताना एखादी मोठी, अत्यंत महत्त्वाची बातमी येते. एखादा सहकारी अचानक ती तुमच्यासमोर आणून ठेवतो. अशा वेळी काहीही माहीत नसतानाही ती बातमी तुम्हाला धैर्याने present करता आली पाहिजे. इथे कस लागतो. रोजची बातमीपत्रे म्हणजे रोजचीच धामधूम असते. एखादा शब्द चुकला तरी त्याची काय, कशी आणि किती किंमत मोजावी लागेल, काही सांगताच येत नाही. 'रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग' या तुकोबांच्या ओळी वेगळ्या अर्थाने आम्ही रोजच जगत असतो.

पण त्यामुळेच या क्षेत्रात कंटाळा कधी येतच नाही. कारण रोजच काय, पण दर मिनिटाला, दर तासाला काहीतरी नवीन घडतच असतं. पण त्यामुळेच रोज कसोटी असते, रोज नव्याने स्वतःला सिद्ध करावं लागतं. रोज शेकडो बातम्या तुमच्यापर्यंत येत असतात. अशा वेळी तुमची संवेदनशीलता जागी ठेवून काम करणं, त्या बातमीला न्याय देणं हे आव्हान असतं. त्यामुळे रोजची सवय असली तरी रोज नव्यानं स्वतःवर मेहनत घेत असते. कालच्यापेक्षा आज आणखी चांगलं लिहिण्याचा प्रयत्न करते. बातमीपत्र वाचण्यासाठी जेव्हा स्टुडीओमध्ये खुर्चीत बसते तेव्हा आज पहिल्यांदाच वाचते आहे, अशा मनोभूमिकेतून बसते. सादरीकरण अधिकाधिक बिनचूक, प्रभावी होण्यासाठी ते उपयुक्त ठरतं. आज इतक्या वर्षांनतर माईकची भीती, दडपण वगैरे राहिलेलंच नाही. ते वातावरण एन्जॉय करते मस्त...Romancing the microphone अशी स्थिती अनुभवतेय आता...!

पूर्वी शाळेत आणि नंतर कॉलेजमध्येही असताना बालचित्रवाणीमध्ये काम करण्याची संधी अनेकदा मिळाली होती. त्यामुळे दूरचित्रवाणी हे माध्यमही माझ्यासाठी फारसं नवीन राहिलं नव्हतं. त्यामुळे आकाशवाणीवर काम करताना त्याचवेळी दूरदर्शनवरही अनेक कामं केली. 'कृषीवार्ता' या कृषिविषयक बातमीपत्रासाठी वृत्तसंपादक म्हणून काम केलं. अनेक मुलाखती घेतल्या. तो एक वेगळा अनुभव. नुसतं लिहिणं, बोलणंच नव्हे तर दिसण्याबाबतही खूप सतर्क ठेवणारा. आपण प्रत्यक्षात कसे दिसतो, स्क्रीनवर कसे दिसतो, आपल्याला काय शोभून दिसतं आणि स्वतःला सर्वार्थाने कसं मेंटेन करावं हे काटेकोरपणे शिकविणारा...!

स्वतंत्र लेखन

टोक्योच्या महापौरांबरोबर

वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांमध्ये काम करताना विविध विषयांवर लेखन केलं गेलं. त्यातून स्वतंत्र लेखनालाही मोठ्या प्रमाणात गती मिळाली. माझ्या आवडीच्या, अभ्यासाच्या विषयांमध्ये मी लिहित गेले. गरज वाटली तिथे त्या-त्या विषयांचा मुळातून अभ्यास करत गेले. आत्तापर्यंत माझी एकूण आठ पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. Glimpses of Pune हे त्यातलं सगळ्यात पहिलं पुस्तक. पुणे महानगरपालिकेच्या अभ्यासदौऱ्यात पत्रकार आणि जपानी भाषेची अभ्यासक म्हणून माझी निवड झाली. City Planning Development या विषयावरचा हा दौरा होता. त्यासाठी पुण्याची समग्र माहिती देणारं हे सचित्र पुस्तक तयार केलं होतं. त्याचं प्रकाशन टोक्योमध्ये झालं. तिथपासून पुढे हा पुस्तकरूपी प्रवास सुरू झाला. २००७ मध्ये देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचं चरित्र लिहिलं. हे पुस्तक अगदी विक्रमी पंधरा दिवसात लिहून पूर्ण केलं. देशातलं आणि मराठीतलं ते त्यांचं पहिलं चरित्र. पुण्यात तत्कालीन सहकारमंत्री पतंगराव कदम यांच्या हस्ते त्याचं प्रकाशन झालं.

महिलांचे प्रश्न, एकूणच महिलांचा अभ्यास (Womens' Studies) हा माझा अभ्यासाचा विषय. पुण्यात भरवल्या जाणाऱ्या भीमथडी जत्रेचं पहिलं वर्ष होतं, तिथे लिहिता-वाचताही न येणाऱ्या वेगवेगळ्या गावातल्या महिला येतात, आपली घरगुती उत्पादनं मांडतात, आत्मविश्वासानं ग्राहकांना सामोऱ्या जातात आणि जाताना सामानाचे डबे रिकामे झाले असले तरी कमरेच्या चंच्या मात्र फुगलेल्या असतात, हे नजरेस पडलेलं सगळं चित्र खूप वेगळं, विलक्षण होतं. मग सातत्याने पुढची काही वर्षं ही जत्रा बघत गेले, त्यातून बचतगट संकल्पनेचा अभ्यास सुरू झाला. हळूहळू त्याला चळवळीचं स्वरूप येत होतं. त्यावेळी त्याचं documentation करणं गरजेचं वाटलं आणि 'कहाणी बचतगटांची' हे पुस्तक तयार झालं. सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील आणि पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते त्याचं प्रकाशन झालं. Microfinance संकल्पना सोप्या मराठीमध्ये स्पष्ट केल्याबद्दल या पुस्तकाची प्रशंसा झाली. पुढे देशातल्या प्रादेशिक पक्षांची वाटचाल आणि आम आदमी पक्षाचा प्रयोग याबद्दल लिहिलं. त्यासाठी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालांना भेटले. त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला, त्यादिवशी दिल्ली विधानसभेत मी प्रेस बॉक्समध्ये बसले होते. आणि ते सगळे नाट्य प्रत्यक्ष अनुभवत होते. त्यावेळी दिल्लीत आम आदमी पक्षाचे कार्यकर्ते, दिल्लीतला सामान्य माणूस, विविध अधिकारी, राजकीय नेते, मुत्सद्दी यांच्या मुलाखती घेतल्या, त्यांची या प्रयोगाबद्दलची मतं अभ्यासली. वर्षभर या घटना घडामोडींवर लक्ष ठेवून होते. वर्षभरानं आम आदमी पार्टी पुन्हा मोठ्या बहुमतानं दिल्लीत निवडून आली. त्यानंतर हे सगळं नाट्य कथन करणारं 'आम जनता आप नेता' हे पुस्तक प्रकाशित केलं. त्याचं जोरदार स्वागत झालं. अलीकडच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांसाठी लिहिलेल्या 'एग्झाम वॉरीअर्स' या पुस्तकाचा मराठीत अनुवाद करण्याची संधी मिळाली.



सोशल मिडीया

आम्ही पत्रकारितेला सुरुवात केली तेव्हा social media हा प्रकारच नव्हता. आता तो प्रचंड वाढलेला आहे. एका अर्थानं बोकाळलेला आहे. त्याचे फायदे आणि तोटे दोन्हीही भरपूर आहेत. अलीकडच्या काळात समाजमाध्यमांचा प्लॅटफॉर्म चुकीच्या पद्धतीने वापरला जातोय, असं जाणवतं. त्याचा सकारात्मक पद्धतीने वापर केला तर त्याचं बळ अफाट आहे. त्याचा उपयोग करून घ्यायला हवा. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या पुणे विभागाची कार्यकारी प्रमुख म्हणून मी काम करते. प्रबोधिनी ही मुळात प्रशिक्षण संस्था आहे. राजकीय नेतृत्व घडवणं, नेतृत्वविकास हा तिचा मुख्य उद्देश. पण त्याचबरोबर कालानुरूप समोर येणारे आव्हानात्मक विषय, कौशल्यविकास यासाठीही आम्ही काम करतो. त्याच अंतर्गत मध्यंतरी आम्ही twitter या विषयावर एक कार्यशाळा घेतली. मुळात हे कसं वापरायचं? जागतिक पातळीवर प्रभावी ठरलेल्या या ॲप्लिकेशनचा उपयोग सकारात्मक गोष्टींसाठी कसा करायचा याचं प्रशिक्षण यामध्ये दिलं. आधी एखाद्याने वाद उभा करायचा, मग त्याच्यावर कुरघोडी, अर्वाच्य शब्दात शिवीगाळ आणि मग तुमचं account suspend होणार यासाठी का वाट बघायची? सध्या अनेक समाजमाध्यमांमध्ये हेच होताना आढळते. समाजमाध्यम हे जग जोडण्याचं माध्यम आहे. त्यासाठी जाणीवपूर्वक जागृती करण्याची गरज आहे. पत्रकारितासुद्धा यामुळे थोडीशी भ्रष्ट होत चाललेली आहे हे जाणवतं. आम्ही माध्यम म्हणून हे पथ्य कायम पाळतो की social media वर येणाऱ्या बातमीची शहानिशा केल्याशिवाय ती वापरत नाही. आम्ही कधीही TRP च्या फंदात पडत नाही. सरकारी प्रसारमाध्यमं म्हणून आकाशवाणी आणि दूरदर्शन जो संयतपणा दाखवतात, तो सगळ्याच ठिकाणी असायला हवा, असं मला वाटतं.

मान्यवरांच्या संपर्कातून संपन्नता

या सगळ्या वाटचालीत विविध क्षेत्रातल्या मान्यवर व्यक्तींशी, सेलिब्रिटीजशी संबंध आला, अजूनही येतो. अनेक मोठ्या, शासकीय कार्यक्रमांची निवेदक, सूत्रसंचालक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, प्रणव मुखर्जी यांचे शासकीय कार्यक्रम, राज्याचा प्रजासत्ताक दिनाचा ध्वजारोहण संचलनाचा कार्यक्रम, राष्ट्रपती, राज्यपाल, केंद्रीय मंत्र्यांसाठी दुभाषी म्हणूनही काम करण्याची संधी मिळाली. अशा विविध क्षेत्रातल्या व्यक्तींमुळे माझ्या वैयक्तिक व्यक्तिमत्त्वात अनन्यसाधारण संपन्नता आली. आपल्याला अनेकदा अशा व्यक्तींविषयी उत्सुकता असते. त्यांच्या मानमरातब, मोठेपणाबद्दल आकर्षण असतं. पण या लोकांबरोबर वावरताना, काम करताना, ही सगळी माणसं मोठी का आहेत हे कळत गेलं, त्यांच्या वर्तनातून ते उलगडत गेलं. त्यांची जीवनशैली, आयुष्यात जपलेली तत्त्व, स्वतःला लावून घेतलेल्या सवयी अशा अनेक गोष्टीमुळे ती मोठी होतात, हे समजत गेलं.

एक छोटंसं उदाहरण सांगते. माझं 'प्रतिभापर्व' पुस्तक प्रकाशित झालं, त्यावेळी केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे परदेश दौऱ्यावर होते. त्यामुळे ते प्रकाशन समारंभास उपस्थित राहणार नव्हते. ते परत आल्यावर पुण्यात आले असता त्यांनी मला भेटायला बोलावलं. सकाळी साडेआठ-पावणेनऊचा सुमार असेल, गप्पा मारत आम्ही नाश्ता करत असतानाच शिंदे साहेबांचा एक नोकर आत आला आणि त्याने त्यांच्या कानात काहीतरी सांगितलं. तो ऐकल्यावर साहेबांनी मला आतल्या खोलीत शिफ्ट होण्याची विनंती केली. मी आत जाऊन बसले. २०-२५ मिनिटांनी काम संपवून आल्यावर शिंदेसाहेब म्हटले, पुण्याचे पोलीस आयुक्त काही कामासाठी भेटायला आले होते. वर्दीतल्या माणसाला कधीही ताटकळत ठेवायचं नाही, हे माझं तत्त्व आहे, म्हणून त्यांच्याशी बोलत होतो. आणि गप्पा पुढे सुरू झाल्या.

असंच एकदा दिल्लीत 'टाईम्स ऑफ इंडिया'चे तेव्हाचे संपादक दिलीप पाडगावकर यांना भेटायला गेलो होतो. त्यांनी आमच्याशी छान गप्पा मारल्या. पत्रकारितेतले अनुभवातून आलेले काही कानमंत्र दिले. निघताना आमच्यातलं कोणीतरी त्यांच्या पाया पडलं. आपण कुणाला खाली वाकून नमस्कार करणं या कृतीकडे ज्येष्ठ व्यक्तीप्रति आदर व्यक्त करण्याचं माध्यम म्हणून पाहतो. पण ते मात्र विजेचा झटका बसावा तसे मागे सरकले. आम्हीही गोंधळलो. तेव्हा त्यांनी सांगितलं, तुम्ही एक पत्रकार आहात, आणि पत्रकारांनी कधीही कोणाच्याही पाया पडायचं नाही. आई-वडील, गुरू हे तुम्ही व्यक्तिगत आयुष्यात सांभाळा. पण सार्वजनिक ठिकाणी पत्रकाराने कुणाच्या पाया पडणं याचा अर्थ सत्तेपुढे झुकणं असा होतो. तुमचा कणा तुम्ही ताठ ठेवला नाहीत तर तुम्ही निःपक्षपाती कधीच होऊ शकणार नाही. असे एक ना दोन...अनेक प्रसंग. पण यातून नकळत खूप गोष्टी शिकायला मिळाल्या.

लग्न म्हणजे स्त्रीच्या आयुष्याची इतिकर्तव्यता आहे, असं मला कधीच वाटलं नाही. त्यामुळे मी स्वतः आनंदाने अविवाहित आहे. मी प्राधान्यानं करिअरवर अधिक लक्ष केंद्रित केलं. वेगवेगळी, अधिक चांगली कामं करत गेले. प्रस्थापित, रुळलेल्या कामांमध्ये बदलत्या काळानुसार निर्माण होत असलेल्या नव्या संधी शोधत गेले. नवी कामं आव्हानं म्हणून स्वीकारत गेले. त्यासाठी आवश्यक नवनव्या गोष्टी, आवश्यक कौशल्यं शिकत गेले. स्वतःच्या क्षमता ताणून पहात स्वतःला तपासत, आजमावत गेले. त्यातून अनेक विस्मयकारक बाबी माझ्या मलाच उलगडत गेल्या. आपण हे ही करू शकतो, हा विश्वास अधिक दृढ झाला. एखाद्या ठिकाणी थांबून राहण्याऐवजी सतत पुढे जात राहणं, नव्या वाटा शोधत राहणं, हा प्रबोधिनीच्या वातावरणातून झालेला संस्कार.

जे काम करायचं ते अतिशय जबाबदारीने हे माझं तत्त्व होतं, आहे. काहीतरी करून वेळ मारून न्यायची किंवा घेतलेली जबाबदारी कालांतराने अर्धवट सोडून द्यायची याची परवानगी माझ्या घरातून झालेले संस्कारही मला देत नाहीत. त्यामुळे लग्नाबाबत निर्णय घेताना याचाही विचार केला. सांसारिक जबाबदाऱ्या घेतल्या असत्या तर कदाचित कामात compromise करावं लागलं असतं. ते एखादवेळी पटलं असतं किंवा नसतंही...ती द्विधा मनस्थिती करून घेण्याची इच्छा नव्हती, म्हणून हा निर्णय घेतला. त्यामुळे काही जबाबदाऱ्या गृहीत असल्या तरी त्या अर्थानं सांसारिक तारांबळ कमी होते. आई-वडिलांबरोबर राहते. त्यांच्या मायेचं छत्र आजवर जीवनात सावली बनून राहिलं आहे. वडील निवृत्त इंजिनिअर, आई कॉलेजची प्राचार्या म्हणून निवृत्त झालेली, डॉक्टर भाऊ विविध देशांमध्ये आयुर्वेदाचा प्रसार करण्याचं शिवधनुष्य पेलणारा...या खेरीज आपल्या वावरानं घरात वेगळंच चैतन्य निर्माण करणारी खूप सारी मांजरं...या सगळ्यांच्या सहवासात जीवनाचं खऱ्या अर्थानं 'आनंदी गाणं' झालं आहे. त्यामुळे कामातील तात्कालिक ताणतणाव, चढउतार समोर आले, सोसावे लागले तरी त्याच्यामुळे तारांबळ होते असं फारसं जाणवलं नाही.

बऱ्याच वर्षांपूर्वी दिल्लीत किरण बेदींची मुलाखत घ्यायला गेले होते. त्यावेळी त्या नुकत्याच तिहार जेलच्या महासंचालक म्हणून नियुक्त झाल्या होत्या. तिथल्या कैद्यांसाठी त्यांनी विपश्यनेचा प्रयोग सुरू केला होता. त्यांना भेटण्याची खूप उत्सुकता होती. त्यापूर्वी त्या दिल्लीत कार्यरत असताना पंतप्रधान इंदिरा गांधी यांची गाडी त्यांनी 'नो पार्किंग' मधून उचलली होती. देशातल्या पहिल्या आय.पी.एस्. ऑफिसर म्हणूनही त्यांची 'क्रेझ' होतीच. एखादी स्त्री अशा प्रकारची जबाबदारी कशी सांभाळू शकते, याबद्दल जाणून घ्यायचं होतं. त्या मुलाखतीत इतर प्रश्न झाल्यावर मी त्यांना विचारलं, 24 x 7 अशी जबाबदारी असलेलं काम आणि घर, सांसारिक जबाबदारी हे दोन्ही कसं काय सांभाळता? त्यावर त्या अत्यंत सहजपणे उत्तरल्या, त्यात काय एवढं विशेष आहे? माझ्या मते Marriage is not an entire life, it is an event in life. त्याचा कामावर परिणाम होण्याचं काहीच कारण नाही. काम करणाऱ्या माणसांना, विशेषतः महिलांना एक वेगळी दृष्टी देणारं असं ते विधान होतं. माझ्या व्यक्तिगत जीवनात विचार करताना अशा गोष्टीही मनात असतात.

पुढे कालांतराने जेव्हा मी पुणे विद्यापीठात womens' studies करत होते त्यावेळी किरण बेदींच्या त्या विधानाचा अर्थ अधिक स्पष्टपणे कळला. परित्यक्ता, बलात्कारित महिलांचा प्रश्न, तो विषय अभ्यासताना लक्षात आलं की जीवनात असा बाका प्रसंग ओढवला की महिलांना अनेकदा घराबाहेर काढलं जातं आणि एका अर्थाने त्यांचं जगणंच संपतं. समाजाचा त्या स्त्रियांबद्दलचा दृष्टीकोन वाईट होतो. अशा वेळी खरं तर तिला धीर द्यायला हवा. गाडी चालवताना अपघात झाला म्हणून आपण गाडी चालवायची सोडून देतो का? काही दिवस जखमा बऱ्या होईपर्यंत आपण घरी राहतो, पण नंतर पुन्हा गाडी चालवायला सुरुवात करतोच की ! मग अशी एखादी दुर्घटना म्हणजे आयुष्यातला एक अपघातच असतो. त्याच्याकडे अपघात म्हणूनच बघितलं पाहिजे, हे तिला सांगितलं पाहिजे आणि धीरानं, नव्यानं पुन्हा एकदा आयुष्याला सुरुवात केली पाहिजे. आयुष्य खूप मोठं आहे आणि खूप सुंदर आहे, याचं भान तिच्या मनात जागवलं पाहिजे, असं वारंवार जाणवत राहिलं. समाज या महिलांना त्यांचं आयुष्य संपल्यासारखी वागणूक देतो. त्यांच्यावर अघोषित बहिष्कार टाकल्यासारखं वागवतो. हे थांबवलं पाहिजे.

आज महिला सक्षमीकरणासाठी समाजात अनेक प्रयत्न चालू आहेत, पण अनेक वर्षं अनेक ठिकाणी भटकंती करून समाज पाहिल्यावर, अनेकींशी बोलल्यावर मला असं वाटतं, की फक्त स्त्रीला काही गोष्टी शिकवून, तिला नुसतं स्वतःच्या पायावर उभं करून सक्षमीकरण होणार नाही. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन या बाबी महत्त्वाच्या आहेतच, पण त्याच्याइतकंच, किंबहुना त्यापेक्षाही काकणभर जास्त महत्त्वाचं आहे ते समाजाची महिलांकडे पाहण्याची दृष्टी बदलणं. जोपर्यंत समाज स्त्रीकडे एक माणूस म्हणून बघत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थानं हे सशक्तीकरण होणार नाही. अनेकदा असं दिसतं की स्त्री कर्तृत्ववान असते, अर्थार्जन करत असते. घराबरोबरच कामाच्या ठिकाणी महत्त्वाच्या पदांवर जबाबदाऱ्या सांभाळत असते. पण घरी आल्यावर मात्र ते तुझं जे काही आहे, ते बाहेरचं बाहेर, आत्ता घरी हे व्हायलाच पाहिजे, असे अघोषित दंडक घालून दिलेले असतात. सुशिक्षित, पुरोगामी म्हणवल्या जाणाऱ्या अनेक घरांमध्ये मी स्वतः पण असे प्रकार पाहिलेले आहेत. संख्या तुलनेनं कमी असेल, पण हे घडतंय, हे नाकारता येत नाही. ही मानसिकता बदलणं गरजेचं आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये त्याची सुरुवात लहान मुलांच्या जडणघडणीपासून करावी लागेल. नैसर्गिक संरचनेमुळे स्वाभाविक असलेल्या काही बाबी वगळता लहानपणापासून घरात मुलांना आणि मुलींना वेगळा न्याय दिला जाता कामा नये. अगदी लहानपणापासून मुलांच्या मनात हा समानतेचा विचार ठसवला पाहिजे. आपण आपल्या मुलांच्या मनात काय रुजवतो, त्यांना कसं घडवतो यातूनच महिला सशक्तीकरणाची खरी सुरुवात होणार आहे असं मला वाटतं. आजही समाज बहुतांश वेळा महिलांकडे माणूस म्हणून नव्हे, तर मादी म्हणून बघतो. हे खूप विदारक आहे. तुम्ही बाई म्हणून बोलता कशा आणि दिसता कशा यावर अनेक पुरुषी नजरा स्थिरावलेल्या असतात. तिचा देह आणि तिची वेशभूषा या पलीकडे जाऊन तुम्ही बाईकडे बघूच शकत नाही का? ही नजर कधी बदलणार? ती ही माणूस आहे, हे आपण मनाने कधी स्वीकारणार? अजूनही अनेक ठिकाणी बाई कामासाठी घराबाहेर पडते, नोकरी करते, म्हणजे ती गरजूच असणार, असं समजून तिचा गैरफायदा घेण्याचे प्रयत्न केले जातात. आपण पैसे देतोय तर घ्या जास्तीची कामं करून, वागवा आपल्या मर्जीनुसार, अशी विकृत मानसिकता अनेक ठिकाणी दिसते. मी स्वतः काही वेळा ती अनुभवलेली आहे. स्त्रीकडेही गुणवत्ता असते आणि त्याच्या उपयोगासाठीही ती नोकरी करू शकते, हे आपला तथाकथित पुरोगामी समाज कधी समजणार की नाही...?

एकदा एका मोठ्या नेत्याच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यासाठी मी गेले होते. कार्यक्रम संपल्यावर त्या नेत्याच्या PA ने मला सांगितलं की साहेबांनी तुम्हाला भेटायला बोलावलं आहे. मला वाटलं काहीतरी काम असेल. पुढे त्यांनी सांगितलं, रात्री जेवायला अमुक ठिकाणी या. ते ऐकून मला विचित्र वाटलं. मी म्हटलं, माफ करा, मी अशी निमंत्रणं स्वीकारत नाही. जे काम आहे ते इथे सांगितलंत तर बरं होईल. थोड्या वेळाने पुन्हा असाच निरोप आला. यावेळेला बरोबर आलेला एक कार्यकर्ता हळूच म्हणाला, तुम्ही म्हणताय खऱ्या की, नाही येणार, पण तुम्हाला कळणार पण नाही तुम्हाला दादा कधी परस्पर उचलून नेतील ते. ते ऐकल्यावर मात्र माझं रक्त खवळलं. आपोआप आवाजाला धार आली अन् मी म्हटलं, तुमच्या दादांनी हवं ते करायला काय मोगलाई लागून गेली का ? पोलीस यंत्रणा नाही का आपल्याकडे ? बघू तुमचे दादा काय करतात आणि मग मी काय करते हे ही तुम्ही बघा. मी जोरात बोलल्यावर मात्र ते घाबरले आणि तिथून काढता पाय घेतला. कधी-कधी विचार करते तेव्हा वाटतं, माझ्यासारख्या पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या बाईच्या वाट्याला असे अनुभव येत असतील तर अडाणी, अशिक्षित, गरजू, निराधार महिलांची काय कथा...!

व्याख्यानं, बचतगटांचे मेळावे, इतर कार्यक्रम यांच्या निमित्तानं अनेक ठिकाणी फिरताना महिलांचे असे अनेक विदारक अनुभव ऐकायला मिळतात. वीसेक वर्षांपूर्वीची गोष्ट असेल, गावातील महिलांनी दारूबंदीची मागणी केली तर त्या पंचायतींमध्ये दारूबंदी करणार, असा निर्णय शरद पवार मुख्यमंत्री असताना सरकारनं जाहीर केला होता. अशी दारूबंदी झालेल्या पंचायतींचा दौरा मी करत होते. त्यावर वृत्तमालिका लिहिण्याचे नियोजन होते. या काळात पाहिलेलं वास्तव भीषण होतं. पुणे जिल्ह्यातल्या एका ग्रामपंचायतीमध्ये महिला सदस्यांना भेटायला गेले. कितीतरी वेळ झाला तरी सरपंच बाई कार्यालयात येईनात. चौकशी केल्यावर घरीच आहेत, असं कळलं. शेवटी इतर सदस्य महिलांच्या म्हणण्यानुसार जवळच असलेल्या त्यांच्या घरी गेले. सरपंच बाई आतल्या खोलीत, बाहेरही येईनात. इतर महिलाही काही बोलेनात. सगळंच गूढ. शेवटी न राहवून दरवाजा ढकलला आणि आतल्या खोलीत शिरले. सरपंच बाई दोन्ही खांद्यावर घट्ट पदर गुंडाळून मुसमुसत बसल्या होत्या. जवळ जाऊन बसले. चौकशी केली. आजारी आहेत का, त्रास होतोय का...माझं भेटीचं कारण पुन्हा सांगितलं. मुसमुसणं थांबत नव्हतं. पाठीवर हात ठेवून त्यांना जवळ घेतलं नि बांध फुटला. पाठीवरचा पदर त्यांनी बाजूला केला, काठीनं मारल्याच्या वळांनी पाठ सोलवटून निघाली होती. रक्ताळलेली पाठ पाहताना मी मनोमन अस्वस्थ होत होते. गावात दारूबंदी करायला पुढाकार घेतला या 'आगाऊपणाची' नवऱ्यानं आदल्या रात्री दिलेली ती शिक्षा होती.

याच दौऱ्यात शहाद्याजवळच्या (जिल्हा-धुळे) एका पंचायतीत गेले होते. तिथे गेल्यावर सरपंच बाई रुग्णालयात आहेत असं कळलं. चौकशी केली तर कारण कुणीच सांगेना. त्यांच्या तब्येतीची विचारपूस करावी म्हणून इतर सदस्य महिलांना घेऊन रुग्णालयात गेले. बाई बऱ्याच भाजलेल्या. जखमा पाहवत नव्हत्या. कुणीच काही बोलायला तयार नाही. गावात खोदून-खोदून चौकशी केली, तिथल्या स्थानिक सामाजिक कार्यकर्त्या बाईंना भेटले, तेव्हा सगळं उलगडत गेलं. या महिला प्रस्थापित पुरुषांना पराभूत करून निवडून आल्या याचा राग होताच. त्यात त्यांनी दारूबंदीची मागणी केली आणि ती घडवून आणली. याचा वचपा काढण्यासाठी पंचायत समितीची बैठक सुरू असताना ही असंतुष्ट मंडळी तिथे घुसली नि सरपंच बाई बसलेली लाकडी खुर्ची त्यांनी रॉकेल ओतून पेटवून दिली. त्यामध्ये या बाई भाजल्या होत्या. सुन्न करणारा अनुभव...

हे असे प्रकार या समाजात होत असतील तर काय करायचं? जोपर्यंत समानतेचे संस्कार प्रत्येक घरात, प्रत्येक मुला-मुलीला दिले जात नाहीत, महिलांना मिळणारी वागणूक सुधारत नाही, तोपर्यंत कटू वाटलं तरी महिला सक्षमीकरण हे आपल्यासाठी मृगजळच राहणार आहे.

कलेचे अधिष्ठान प्रेरणादायक

कला ही जीवनात अनन्यसाधारण महत्त्वाची आहे असं माझं स्पष्ट मत आहे. जीवनात कलेचे अधिष्ठान नसेल, किंवा कलेचा आस्वाद घेण्याची क्षमता नसेल तर जीवन रुक्ष, वैराण होऊन जाईल. कलेबद्दलची आस्वादक वृत्ती संपन्नतेकडे घेऊन जाते. मी गाणं शिकत होते. ते पूर्ण करू शकले नाही, पण आजही त्याचा उत्तम आस्वाद घेऊ शकते. प्रत्येक वेळी गाता आलं नाही तरी गाण्याचा कान असणं महत्त्वाचं ! मी नृत्य- नाटक -अभिनय हे ही थोडं-थोडं शिकले. त्यातलं गाणं पुढे वाढवायची इच्छा होती. पण शैक्षणिक कालखंडात ते पूर्णांशानं शक्य झालं नाही. त्यावेळी performing arts कडे करिअर म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन विकसित झालेला नव्हता. आधी शिक्षण घ्या, पदवी मिळवा, स्वतःच्या पायावर उभे रहा आणि मग छंद जोपासा, अशी सर्वसाधारण मध्यमवर्गीय विचारप्रणाली होती. त्यामुळे कलेमध्ये करिअर करणं शक्य झालं नाही. पण कलेचं असणं, तिची साथसंगत माणसाला सतत जिवंत ठेवते. निराशेच्या क्षणी एखादी गाण्याची ओळ कानावर पडली तर मनस्थिती बदलते. नव्या जोमानं माणूस कामाला लागतो. कलेचं हे सामर्थ्य फार मोठं आहे. अनेकदा माणसं पैशासाठी कामं करत राहतात पण त्यातून समाधान मिळत नाही. हे समाधान कलेमुळे निश्चितपणे मिळते. माणसाची अभिरुची कलेच्या माध्यमातून विकसित झाली तर त्यामुळे व्यक्तिमत्त्वातही संपन्नता येते. ही अभिरुची संपन्नता जोपासण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. अभिरुची संपन्न समाजामध्ये अपप्रवृत्ती टिकत नाहीत, गुन्हेगारीचं प्रमाण कमी होतं, हा त्यातला आणखी नंतरचा भाग.

उत्तमतेचा ध्यास

मी स्वतः फार मोठी उद्दिष्टं डोळ्यासमोर ठेवून चालते अशातला भाग नाही. पण जे करते आहे, ते उत्तमच करायचं हा ध्यास असतो. कितीतरी विषयांवर लिहायचं आहे. काही विषयांवर संशोधन सुरू आहे. काळानुसार समोर येणारे विविध विषय, उभी राहणारी आव्हानं पाहताना प्रशिक्षण, समुपदेशन किंवा अन्य कोणत्या मार्गानं पुढे जाता येईल याचा विचार सुरू असतो. 'रूप पालटू देशाचे' हे प्रबोधिनीने बालपणीच मनात रुजवलेलं, पुढे आजवरची वाटचाल करताना पुसट होऊ न दिलेलं ध्येय गाठायचं असेल तर त्या ध्येयापर्यंत पोचविणारी जी साखळी आहे, त्यातली प्रत्येक कडी सक्षम असायला हवी, हे प्रकर्षानं जाणवतं. त्यासाठी समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोचणं, त्यासाठी प्रबोधन, प्रशिक्षण आणि त्याबरोबरच आत्मचिंतन महत्त्वाचं ठरणार आहे. इतरांना घडविताना आपणही वाढत राहायला हवं, वैचारिक, बौद्धिक समृद्धी यायला हवी. ही प्रक्रिया निरंतर सुरू ठेवायला पाहिजे, हे पुन्हा-पुन्हा मनात अधोरेखित होत जातं. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या माध्यमातून विविध उपक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम राबविताना हाच दृष्टीकोन असतो. माणसांना काळानुरूप ज्ञान देणं, त्यांना सक्षम बनवणं, विचारप्रवण करणं या हेतूनंच हे प्रशिक्षण दिलं जातं. याच सगळ्या गोष्टींवर आगामी काळातही काम करायचा विचार आहे. माध्यमांमध्ये काम करत असल्यानं आज समाजामध्ये माध्यमसाक्षरता वाढवणं, त्यासाठी सजग प्रयत्न करणं हे सुद्धा एक आव्हानच वाटतं.

नेतृत्व विकास

नेतृत्वाबद्दल प्रबोधिनीने मूलभूत विचार दिला. नेतृत्वाची एक व्याख्या करणं थोडं अवघड वाटतं. माझ्या मते तो विविध गुणांचा समुच्चय असतो. नेतृत्व ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये ध्येयापर्यंत पोचण्यासाठी आजूबाजूच्या लोकांना बरोबर घेऊन, विशिष्ट दृष्टीकोन ठेवून वाटचाल करावी लागते. नेतृत्व करणारी व्यक्ती बहुआयामी असावी लागते. लौकिकार्थानं ती उच्चशिक्षित नसेलही कदाचित, पण बरोबरच्या लोकांना समजून घेण्याची, त्यांना योग्य दिशा दाखविण्याची, त्यांच्यातील ऊर्जा सकारात्मक, विधायक दिशेला वळवण्याची त्याची क्षमता हवी. तुमच्यावर विश्वास ठेवून तुमच्याबरोबर येणाऱ्या लोकांना

समजून घेणं, प्रसंगी त्यांच्या चुका पोटात घालणं आणि त्यांना पुढे ध्येयाप्रत घेऊन जाणं हे सोपं नव्हे. त्यामध्ये नेतृत्वाचा कस लागतो. जिथे कमतरता जाणवेल तिथे ती भरून काढता यायला हवी. व्यक्तींच्या माध्यमातून समूह घडवणं आणि मग तो नियोजनबद्ध पद्धतीनं पुढे नेणं म्हणजे नेतृत्व. सगळीच माणसं परिपक्व, हुशार, एक विचाराची असतील तर त्यांना घडवण्यात कौशल्य काय? शिवछत्रपती का मोठे होते? कारण त्यांनी मावळातल्या साध्यासुध्या लोकांच्या, मावळ्यांच्या मनात हिंदवी स्वराज्याची ज्योत प्रज्ज्वलित केली. आणि त्यासाठी त्यांना लढवय्या बनवलं. त्यासाठी लागणारं शिक्षण, प्रशिक्षण देऊन त्यांना घडवलं. नेतृत्वाचा वस्तुपाठच आहे महाराजांचं उभं चरित्र !

खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्याबरोबर

आजवरच्या वाटचालीत अनेक गुरुतुल्य व्यक्ती भेटल्या. कामाच्या निमित्ताने जवळपास तीन-साडेतीनशे मुलाखती घेतल्या. विविध क्षेत्रातल्या दिग्गजांना भेटायची संधी मिळाली. शंकरराव चव्हाण, टी. एन्. शेषन, के. के. हेब्बर, बिरजू महाराज, बालमुरलीकृष्ण, गोपीकृष्ण, गुलजार, डॉ. वसंत गोवारीकर, डॉ. गोविंद स्वरूप, शांता शेळके, शरद तळवलकर, प्रभाकर पणशीकर, बी. आर. खेडकर...अशी किती नावं सांगावीत.. त्यांचे विचार ऐकताना, शब्दबद्ध करताना अनेक गोष्टी शिकता आल्या. फर्ग्युसन कॉलेजमध्ये मराठीचे विभागप्रमुख डॉ. गं. ना. जोगळेकर 'साहित्य सहकार' हे मंडळ चालवायचे. त्या उपक्रमांमध्ये सातत्यानं भाग घ्यायची. आमच्या कॉलेजमध्येही डॉ. अनुराधा पोतदार विभागप्रमुख होत्या. तिथेही असे उपक्रम व्हायचे. घरातही साहित्यप्रेमी वातावरण होतं. त्यातून साहित्याची अभिरुची वाढली. लेखनाला गती मिळाली.

कीर्ती शिलेदार व दिप्ती भोगले यांच्याबरोबर

पत्रकारितेत ज्येष्ठ पत्रकार वरुणराज भिडे यांनी खऱ्या अर्थाने जडणघडण केली. खूप बारकावे शिकवले. वाटेल त्या तडजोडी न करता, आपले स्वत्व जपत पत्रकारिता कशी करावी हे त्यांच्याकडून शिकायला मिळालं. पत्रकार म्हणून रुजू झाले त्या पहिल्या दिवशी त्यांनी विचारलं, तुला सक्रीय पत्रकार व्हायचं आहे की पत्रकारितेतलं क्लार्क? त्यांचा रोख न कळून मी सहजपणे म्हटलं, सक्रीय पत्रकार ते ऐकल्यावर ते म्हणाले, असं असेल तर मग तुला दोन-तीन गोष्टींची तयारी ठेवायला लागेल. एक म्हणजे अभ्यासाला पर्याय नाही. तो सतत करावाच लागेल. दुसरं म्हणजे कठोर परिश्रमांना पर्याय नाही. आणि तिसरं सर्वात महत्त्वाचं म्हणजे आपली ओळख 'स्वाती महाळंक' अशीच असायला हवी, 'स्वाती महाळंक, सकाळ', 'स्वाती महाळंक, दूरदर्शन', 'स्वाती महाळंक, आकाशवाणी' अशी नव्हे. दुसऱ्या ब्रँडच्या नावाने प्रसिध्द व्हायचं नाही, आपलं काम आणि कर्तृत्व यातून स्वतःचा ब्रँड, ओळख निर्माण करता यायला हवी. हा कानमंत्र मी आजतागायत जिवापाड जपला आहे.

राजदत्त यांच्या हस्ते सन्मान स्वीकारताना

अंतरीचे स्नेहबंध

आता नियमित स्वरूपात प्रबोधिनीत येणं जमत नसलं तरी आजही प्रबोधिनीशी मनातलं नातं दृढ आहे. शाळेने काय दिलं याचा विचार करते तेव्हा आजही आपली ओंजळ मौल्यवान गुणसंपदेनं भरलेली आहे, हे जाणवत रहातं. काळाच्या विविध टप्प्यांवर, मूल्यमापनाचे मनातले मापदंड सुस्पष्ट होत गेल्यावर त्याचं महत्त्व अधिक ठळकपणे लक्षात आलं. प्रबोधिनीसारखी संस्था गेली ५० वर्षं ज्या ध्येयानं आणि निष्ठेनं माणूस घडवण्याचं काम करते आहे ते आजच्या काळात अनन्यसाधारण महत्त्वाचं आहे. हे काम अधिकाधिक वाढवण्याचा आपापल्या परीने प्रयत्न करायला हवा. सुवर्ण महोत्सवाच्या निमित्तानं सुरू झालेले उपक्रम त्या दृष्टीनं प्रशंसनीय आहेत. याच मार्गावर कार्यरत राहण्यासाठी बळ मिळावं म्हणून म्हणावंसं वाटतं, 'अमुच्या शुभव्रतांना आई तुझे शुभाशिष दे...!'

RAPID FIRE

१. आवडता चित्रपट – उंबरठा, इजाजत

२. आवडतं पुस्तक – एक सांगता येणार नाही पण श्रीमान योगी, शापित यक्ष

३. छंद – वाचन, गायन, पर्यटन

४. पहिली प्रतिक्रिया –

- पत्रकारिता – सकाळमधला पहिला दिवस आठवतो.
- व्यासंग – खूप पुस्तकं आणि भरपूर वाचन.
- भारत – दिल्ली, म्हैसूर अशी अनेक शहरं, हिमालयापासून कन्याकुमारी पर्यंतची विविधता..
- ज्ञान प्रबोधिनी – डौलदार वास्तू, आप्पा, आण्णा, पद्यांचे घुमणारे आवाज आणि कितीतरी गोष्टी ...
- आप्पा पेंडसे – शांतपणे बासरी वाजविण्यात तल्लीन झालेले आप्पा.

स्वाती महाळंक
swatimahalank@gmail.com
8888102207

मुलाखत – चिन्मयी खरे, अथर्व पाटणे शब्दांकन – चिन्मयी खरे

संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर

आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org